**संपादकीय,**

'नवज्योत' या आंतरविद्याशाखीय आंतरराष्ट्रीय संशोधन पत्रीकेच्या तमाम लेखक वाचक आणि हितचिंतकास सदर अंक समर्पीत करताना हर्ष होत आहे आपल्या पाठबळावर नवज्योतने दहाव्या वर्षात यशस्वी पदार्पन करताना संशोधन पत्रिकेसाठी लागणारा Impcat factor ७.५९४ इतका उच्च दर्जाचा प्राप्त केला आहे ही आम्हा संपादक मंडळास भुषणावह बाब आहे युजीसी केअर लिस्ट व ई जर्नलच्या मान्यतेसाठी प्रस्ताव सादर केला असून संशोधनाच्या पातळीवर तीव्र गतीने होणारे बदल स्वीकारण्यासाठी संपादक मंडळ कटिबध्द आहे.

वैश्विक पातळीवर तीव्र गतीने होणारे बदल आणि त्यांचे मानवी मुल्यांवर होणारे दूरगामी परिणाम चिंता व चिंतनाचा विषय झालेले आहेत आपल्या देशाचा विचार करतांना अर्थव्यवस्थेसंबंधी विविध पध्दतीने अभ्यास करणे आवश्यक आहे. भारतीय समाजावर राज्यशास्त्रा प्रमाणेच सर्व सामाजिकशास्त्राचाही प्रभाव पडत असतो. तसेच भारतीय राज्यघटनातील तरतुदींचा सामाजिक व राजकीय प्रभाव, अर्थ विषयक आयोग आणि भारतीय संघराज्य व्यवस्था याचा अभ्यास संध्यस्थितीत करणे आवश्यक आहे. बदलत्या सामाजिक परिस्थितीत व धोरणामध्ये लोकशाही व्यवस्थे समोरील ही विविघ आव्हाने आहेत.

कोरोना महामारीचा आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय परिणाम त्यातून निर्माण झालेला कोलाहल त्याचा राज्यव्यवस्था आणि माणवी संबंधावर पडलेला प्रभाव या संपूर्ण पार्श्वभूमीवर नवज्योतच्या शोध निंबधकारांनी आपआपल्या विषयांची मांडणी केली असून त्यानुसार आंतरविद्याशाखीय विश्लेषनाच्या कक्षा अधिक व्यापक केल्या आहेत पर्यायाने या अंकाचा गुणात्मक दर्जासुध्दा उंचावला आहे.

नवज्योतचे सल्लागार मंडळ, संपादक मंडळ आणि मूल्यमापन समिती यांचे सक्रीय योगदान तसेच लेखक, वाचक व हितचिंतकच्या सहकार्यामुळे 'नवज्योत' आपला गुणात्मक दर्जा अधिक गतिमान करणार यात शंका नाही. सर्व वाचकवर्गास नवीन वर्षाच्या शुभेच्छासह अंक सादर.

संपादक

प्रा.डॉ.संदीप तुंदूलवार